**डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था**
**(अभिमत विद्यापीठ)**
**पुणे ४११ ००६.**

# परिपत्रक

**विषय : शासकीय सोयी/सुविधांकरीता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणेबाबत.**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, खालील बाबींसाठी अर्जासोबत शपथपत्र दाखल करणे **बंधनकारक** आहे.

१) विद्यार्थ्यांनी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक शुल्क भरताना शपथपत्र दाखल करणे बंधनकारक आहे.

२) विद्यार्थ्यांनी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्यानंतर पात्रता पूर्ती अर्ज (Eligibility Form) सादर करताना महत्वाच्या कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी शपथपत्र दाखल करणे बंधनकारक आहे. (उदा. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जातीचा दाखला, शैक्षणिक कालावधीमधील खंड आणि नावातील बदल इ.)

३) विद्यापीठात नवीन पदावर रूजू होताना कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी शपथपत्र दाखल करणे बंधनकारक आहे.

त्याचप्रमाणे खालील बाबींसाठी अर्जासोबत शपथपत्र दाखल करणे **बंधनकारक नाही.**

१) विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रवेश घेतेवेळी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती स्वयंसाक्षांकित करून देण्यात याव्यात यासाठी शपथपत्र दाखल करणे बंधनकारक नाही. (उदा. गुणपत्रिका, रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला आणि आधारकार्ड इ.)

२) अंतर्गत कार्यालयीन कामात विविध कागदपत्रे जमा करताना किंवा अर्ज करताना फक्त स्वयंसाक्षांकित प्रती सादर कराव्यात यासाठी शपथपत्र दाखल करणे बंधनकारक नाही.

वरील सर्व गोष्टींची सर्व कर्मचारी व विद्यार्थीनी नोंद घ्यावी.

**दिनांक : २४/११/२०१५**

**(सी. व्ही. जोशी)**
**कुलसचिव**

**प्रतः १) सर्व विभाग प्रमुख**
**२) सर्व वार्ताफलक**